**L. A. BILL No. XII OF 2021.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA GOODS AND SERVICES TAX ACT, 2017.

**सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२.**

**महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

२०१७ चा महा. ४३.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

(२) या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्या खेरीज, हे कलम तात्काळ अंमलात येईल, आणि उर्वरित कलमे, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने अंमलात येतील आणि या अधिनियमाच्या विविध तरतुदींसाठी वेगवेगळे दिनांक नियत करता येतील आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या अशा कोणत्याही तरतुदींमधील कोणत्याही संदर्भाचा, ती तरतूद अंमलात येण्याचा संदर्भ असल्याप्रमाणे अन्वयार्थ लावण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ७ ची सुधारणा.

२०१७ चा महा. ४३.

**२.** महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ७ मधील, पोट-कलम (१) मधील, खंड (क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल आणि तो, १ जुलै २०१७ पासून समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात येईल :—

"(कक) नैसर्गिक व्यक्ती व्यतिरिक्त एखाद्या व्यक्तीने, रोख रकमेसाठी, विलंबित प्रदानासाठी किंवा अन्य मौल्यवान मोबदल्यासाठी तिच्या सदस्यांशी किंवा घटकांशी केलेला अथवा तिच्या सदस्यांनी किंवा घटकांनी अशा व्यक्तीशी केलेला व्यवहार किंवा संव्यवहार.

**स्पष्टीकरण.—**या खंडाच्या प्रयोजनांसाठी, याद्वारे, असे स्पष्ट करण्यात येते की, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात अथवा कोणत्याही न्यायालयाच्या, न्यायाधिकरणाच्या किंवा प्राधिकरणाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, व्यक्ती आणि तिचे सदस्य किंवा घटक या दोन स्वतंत्र व्यक्ती असल्याचे मानण्यात येतील आणि परस्परांतील व्यवहार किंवा संव्यवहार याचा पुरवठा हा अशा एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे केला असल्याचे मानण्यात येईल ;".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १६ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १६ मधील, पोट-कलम (२) मधील, खंड (क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(कक) खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या बीजकाचे किंवा नावेपत्राचे तपशील, पुरवठादाराकडून जावक पुरवठ्याच्या विवरणपत्रामध्ये सादर करण्यात आला नसेल आणि असे तपशील कलम ३७ अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने अशा बीजकाच्या किंवा नावेपत्राच्या प्राप्तकर्त्याला कळविण्यात आला नसेल ;".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ३५ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३५ मधील, पोट-कलम (५) वगळण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ चे कलम ४४ बदली दाखल करणे.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४४ ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

वार्षिक विवरण.

"**४४.** निविष्टी सेवा वितरक, कलम ५१ किंवा कलम ५२ अन्वये कर भरणारी व्यक्ती, नैमित्तिक करपात्र व्यक्ती आणि अनिवासी करपात्र व्यक्ती यांव्यतिरिक्त प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, वार्षिक विवरण विहित करण्यात येईल अशा वेळी व अशा नमुन्यात आणि अशा रीतीने इलेक्ट्रॉनिक पद्धतीने दाखल करील ज्यात, प्रत्येक वित्तीय वर्षासाठी लेखापरीक्षा केलेल्या वार्षिक वित्तीय विवरणपत्रासह, त्या वित्तीय वर्षासाठी सादर केलेल्या विवरणात घोषित केलेल्या मूल्याचा मेळ बसविणारे स्वयं-प्रमाणित पुनर्मेळ विवरणपत्र अंतर्भूत करता येईल :

परंतु, आयुक्तास, परिषदेच्या शिफारशीवरून, अधिसूचनेद्वारे, या कलमान्वये वार्षिक विवरण भरण्यापासून नोंदणीकृत व्यक्तींच्या कोणत्याही वर्गास सूट देता येईल :

परंतु आणखी असे की, या कलमामध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, ज्यांची लेखा पुस्तके भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक किंवा त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये स्थानिक प्राधिकरणांच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासाठी नियुक्त केलेला लेखा परीक्षक यांच्याद्वारे लेखापरीक्षा करण्यास अधीन आहेत, अशा केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही विभागाला किंवा स्थानिक प्राधिकरणाला लागू असणार नाही. ".

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५० मधील, पोट-कलम (१) मधील, परंतुकाऐवजी पुढील परंतुक दाखल करण्यात येईल आणि ते, १ जुलै २०१७ पासून दाखल करण्यात आल्याचे मानण्यात येईल :— सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ५० ची सुधारणा.

" परंतु, एखाद्या कर कालावधीत केलेल्या आणि कलम ३९ च्या तरतुदींनुसार नियत दिनांकानंतर सादर केलेल्या उक्त कालावधीच्या विवरणात घोषित केलेल्या पुरवठ्यांच्या बाबतीत, प्रदेय असलेल्या करावरील व्याज हे, असे विवरण उक्त कालावधीच्या बाबतीतील कलम ७३ किंवा कलम ७४ अन्वये कोणत्याही कार्यवाहीच्या प्रारंभानंतर सादर केले असेल त्याखेरीज, इलेक्ट्रॉनिक रोकड खातेवाहीमध्ये नावे खाते नोंदकरून जो भरला असेल त्या कराच्या भागावर प्रदेय असेल.".

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५४ मधील, पोट-कलम (८क) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल आणि ते, १ सप्टेंबर २०१९ पासून दाखल करण्यात आल्याचे मानण्यात येईल :— सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ५४ ची सुधारणा.

" (८क) जेव्हा केंद्र सरकारने राज्य कराचा परतावा संवितरित केला असेल तेव्हा, शासन अशा परताव्याच्या रकमे इतकी रक्कम केंद्र सरकारला हस्तांतरित करील. ".

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७४ मधील, स्पष्टीकरण १ मधील, खंड (दोन) मध्ये, " कलमे १२२, १२५, १२९ व १३० " या मजकुराऐवजी " कलमे १२२ व १२५ " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ७४ ची सुधारणा.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७५ मधील, पोट-कलम (१२) मध्ये, पुढील स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात येईल :— सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ७५ ची सुधारणा.

**" स्पष्टीकरण.—** या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ " स्वयंनिर्धारित केलेला कर " या शब्दप्रयोगात, कलम ३७ अन्वये दाखल केलेल्या जावक पुरवठ्याच्या तपशिलाप्रमाणे प्रदेय असलेल्या कराचा समावेश असेल, परंतु ज्याचा समावेश कलम ३९ अन्वये दाखल केलेल्या विवरणामध्ये केलेला नाही. ".

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८३ मधील, पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :— सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ८३ ची सुधारणा.

" (१) जेव्हा प्रकरण-बारा, प्रकरण-चौदा किंवा प्रकरण पंधरा यांखालील कोणतीही कार्यवाही सुरू केल्यानंतर, शासनाच्या महसुलाच्या हिताचे रक्षण करण्याच्या प्रयोजनासाठी, तसे करणे आवश्यक असल्याबाबत आयुक्ताचे मत झाले असेल त्या बाबतीत, त्यास लेखी आदेशाद्वारे, विहित करण्यात येईल अशा रीतीने करपात्र व्यक्तीच्या किंवा कलम १२२ च्या पोट-कलम (१क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या, बँक खात्यासह तिच्या मालकीच्या कोणत्याही मालमत्तेवर, तात्पुरती जप्ती आणता येईल. ".

**११.** मुख्य अधिनियमाच्या कलम १०७ मधील, पोट-कलम (६) मध्ये, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :— सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १०७ ची सुधारणा.

" परंतु अपीलकर्त्याने शास्तीच्या पंचवीस टक्क्यांइतकी रक्कम प्रदान केल्याशिवाय कलम १२९ च्या पोट-कलम (३) खालील आदेशाविरुद्ध अपील दाखल करता येणार नाही. ".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १२९ ची सुधारणा.

**१२.** मुख्य अधिनियमाच्या कलम १२९ मधील,—

(एक) पोट-कलम (१) मधील, खंड (क) व (ख) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येतील :—

" (क) जेव्हा वस्तुचा मालक अशी शास्ती प्रदान करण्यास पुढे येतो तेव्हा, अशा वस्तुवर प्रदेय असलेल्या कराच्या दोनशे टक्के इतक्या समतूल्य शास्तीचे प्रदान केल्यावर, आणि करमाफ वस्तुंच्या बाबतीत, वस्तुंच्या मूल्याच्या दोन टक्के इतकी समतूल्य रक्कम किंवा रुपये पंचवीस हजार, यापैकी जी कमी असेल, तितक्या रकमेचे प्रदान केल्यावर ;

(ख) जेव्हा वस्तुचा मालक अशी शास्ती प्रदान करण्यास पुढे येत नसेल तेव्हा, वस्तुच्या मूल्याच्या पन्नास टक्के किंवा अशा वस्तुवर प्रदेय असलेल्या कराच्या दोनशे टक्के, यापैकी जी अधिक असेल तितक्या समतूल्य रकमेचे प्रदान केल्यावर, आणि करमाफ वस्तुंच्या बाबतीत, वस्तुंच्या मूल्याच्या पाच टक्के किंवा रुपये पंचवीस हजार रुपये, यापैकी जे कमी असेल, तितक्या रकमेचे प्रदान केल्यावर ; " ;

(दोन) पोट-कलम (२) वगळण्यात येईल ;

(तीन) पोट-कलम (३) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (३) वस्तू व वाहने अडकवून ठेवणारा किंवा जप्त करणारा समुचित अधिकारी, असे अडकवून ठेवल्यापासून व जप्त केल्यापासून सात दिवसांच्या आत शास्ती विनिर्दिष्ट करणारी नोटीस देईल आणि त्यानंतर पोट-कलम (१) च्या खंड (क) किंवा खंड (ख) अन्वये शास्तीचे प्रदान करण्यासाठी अशी नोटीस बजावल्याच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत आदेश देईल ; " ;

(चार) पोट-कलम (४) मधील " कोणताही कर, त्यावरील व्याज, किंवा शास्ती याची " या मजकुराऐवजी " कोणत्याही शास्तीची " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(पाच) पोट-कलम (६) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (६) जेव्हा कोणत्याही वस्तूची वाहतूक करणाऱ्या व्यक्तीने किंवा वस्तूच्या मालकाने पोट-कलम (३) अन्वये पारित केलेल्या आदेशाची प्रत मिळाल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत, पोट-कलम (१) अन्वये शास्तीची रक्कम प्रदान करण्यात कसूर केली असेल त्याबाबतीत, अशा प्रकारे अडकवून ठेवलेली किंवा जप्त केलेली वस्तू किंवा वाहन, पोट-कलम (३) अन्वये प्रदेय असेलेली शास्ती वसूल करण्यासाठी विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा कालावधीत, विक्री करण्यास किंवा अन्यथा विल्हेवाट लावण्यास पात्र असेल :

परंतु, पोट-कलम (३) खालील शास्ती किंवा एक लाख रुपये यांपैकी जी कमी असेल तितक्या रकमेचे वाहतूकदाराने प्रदान केल्यावर, वाहन सोडून देण्यात येईल :

परंतु आणखी असे की, जेव्हा अडकवून ठेवलेल्या किंवा जप्त केलेल्या वस्तू नाशवंत किंवा धोकादायक स्वरूपाच्या असतील किंवा कालांतराने त्यांचे मूल्य घटण्याचा संभव असेल तेव्हा अशा बाबतीत, उक्त पंधरा दिवसांचा कालावधी समुचित अधिकाऱ्यांमार्फत कमी करता येईल. ".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १३० ची सुधारणा.

**१३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १३० मधील,—

(क) पोट-कलम (१) मध्ये “ या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, जर ”, या मजकुराऐवजी “ जेव्हा ” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२) मधील, दुसऱ्या परंतुकामधील, “ कलम १२९ च्या पोट-कलम (१) अन्वये लादण्यायोग्य असलेल्या शास्तीच्या रकमेपेक्षा ” या मजकुराऐवजी “ अशा वस्तूंवर प्रदेय असलेल्या कराच्या शंभर टक्के इतक्या समतूल्य शास्तीपेक्षा ” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (३) वगळण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ चे कलम १५१ बदली दाखल करणे.

**१४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५१ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल,—

माहिती मागविण्याचा अधिकार.

“ **१५१**. आयुक्ताला किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याला, आदेशाद्वारे, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीत, अशा नमुन्यात, आणि अशा रीतीने या अधिनियमाशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबीसंबंधी, माहिती सादर करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीला निदेश देता येतील. ”.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १५२ ची सुधारणा.

**१५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५२ मधील, —

(क) पोट-कलम (१) मध्ये,–

(एक) “ कोणत्याही व्यक्तिगत विवरणात किंवा त्याच्या भागात ” हा मजकूर वगळण्यात येईल ;

(दोन) “ या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या ” या मजकुराआधी “ संबंधित व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय ” हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२) वगळण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या अनुसूची दोनची सुधारणा.

**१६.** मुख्य अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची दोन मधील, परिच्छेद ७ वगळण्यात येईल आणि तो, १ जुलै २०१७ पासून वगळण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

वस्तू व सेवा कर परिषदेद्वारे वस्तू व सेवा कर कायद्यांमध्ये सुधारणा करणारे अनेक निर्णय घेण्यात आलेले आहेत. त्यानुसार, संसदेने वित्त अधिनियम, २०२१ (२०२१ चा १३) याद्वारे, केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ (२०१७ चा १२) आणि एकात्मिक वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ (२०१७ चा १३) यांमध्ये सुधारणा केलेल्या आहेत. केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ आणि महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ (२०१७ चा महा.४३) यांच्या तरतुदींमध्ये एकरुपता व प्रयोज्यता राखण्यासाठी, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यामध्ये सुधारणा करणे इष्ट वाटते.

२. महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ याच्या प्रस्तावित सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :—

(एक) कलम ७ च्या पोट-कलम (१) मध्ये नवीन खंड (कक) आणि स्पष्टीकरण समाविष्ट करणे:- जेणेकरून, नैसर्गिक व्यक्ती व्यतिरिक्त एखाद्या व्यक्तीने, रोख रकमेसाठी, विलंबित प्रदानासाठी किंवा अन्य मौल्यवान मोबदल्यासाठी तिच्या सदस्यांशी किंवा घटकांशी केलेला अथवा तिच्या सदस्यांनी किंवा घटकांनी अशा व्यक्तीशी केलेला व्यवहार किंवा संव्यवहारांवरील कराच्या आकारणीची सुनिश्चिती करता यावी म्हणून कलम ७ च्या पोट-कलम (१) मध्ये नवीन खंड (कक) समाविष्ट करून, १ जुलै २०१७ पासून पूर्वलक्षी प्रभावाने सुधारणा करण्यात येत आहे.

ती व्यक्ती आणि तिचे सदस्य किंवा घटक या दोन स्वतंत्र व्यक्ती असल्याचे मानण्यात येईल आणि कार्यांचा किंवा व्यवहारांचा परस्पर पुरवठा हा एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे होईल असे मानण्यात येईल, असे स्पष्ट करण्यासाठी, त्यात एक स्पष्टीकरण समाविष्ट करण्याचे देखील प्रस्तावित आहे.

(दोन) कलम १६ च्या पोट-कलम (२) मध्ये खंड (कक) समाविष्ट करणे :–जेव्हा पुरवठादाराद्वारे जावक पुरवठ्याच्या विवरण पत्रामध्ये अशा बीजकाचे किंवा नावे पत्राचे तपशील दाखल करण्यात आलेले असतील आणि असे तपशील अशा बीजकाच्या किंवा नावेपत्राच्या प्राप्तकर्त्याला कळवण्यात आलेले असतील, तर प्राप्तकर्त्याला बीजक किंवा नावेपत्र यांवरील निविष्टी कराच्या जमा रकमेचा उपयोग करून घेता येईल, अशी तरतूद करता यावी म्हणून, कलम १६ च्या पोट-कलम (२) मध्ये नवीन खंड (कक) समाविष्ट करून, त्याची सुधारणा करण्यात येत आहे.

(तीन) कलम ३५ चे पोट-कलम (५) वगळणे :– विनिर्दिष्ट केलेल्या व्यवसायीकडून वार्षिक खात्याचे लेखापरिक्षण करून घेण्याबाबतची आणि आपसमेळ विवरणपत्र सादर करण्याबाबतची अनिवार्यता काढून टाकता यावी म्हणून कलम ३५ चे पोट-कलम (५) वगळणे हा या सुधारणेचा हेतू आहे.

(चार) कलम ४४ ऐवजी नवीन कलम दाखल करणे :– विनिर्दिष्ट व्यवसायीकडून यथोचित लेखापरीक्षण केलेले आपसमेळ विवरणपत्र दाखल करण्याची आवश्यकता काढून टाकता यावी आणि स्वयं प्रमाणनाच्या आधारे वार्षिक विवरणपत्र दाखल करण्यासाठी तरतूद करता यावी, म्हणून कलम ४४ बदली दाखल करणे हा या सुधारणेचा हेतू आहे. ही सुधारणा एखाद्या करदात्यांच्या वर्गास वार्षिक विवरणपत्र दाखल करण्याच्या आवश्यकतेतून वगळ्यासाठी आयुक्ताला आणखी शक्ती प्रदान करते.

(पाच) कलम ५० च्या पोट-कलम (१) ची सुधारणा :– १ जुलै २०१७ पासून पूर्वलक्षी प्रभावाने एकूण रोख दायित्वावरील व्याज आकरण्यात यावे, म्हणून कलम ५० च्या पोट-कलम (१) मध्ये परंतुक दाखल करणे हा या सुधारणेचा हेतू आहे.

(सहा) कलम ५४ च्या पोट-कलम (८क) ची सुधारणा :– शासनास १ सप्टेंबर २०१९ पासून पूर्वलक्षी प्रभावाने, केंद्र सरकारद्वारे संवितरित केलेली राज्य कराच्या परताव्याच्या रकमेइतकी रक्कम केंद्र शासनाला हस्तांतरीत करणे शक्य व्हावे म्हणून, कलम ५४ चे पोट-कलम (८क) दाखल करणे हा या सुधारणेचा हेतू आहे.

(सात) कलम ७४ ची सुधारणा:– मार्गस्थ वस्तू आणि वाहने यांची जप्ती करण्याची आणि सरकारजमा करण्याची कार्यवाही कर वसुलीच्या कार्यवाहीपासुन स्वतंत्र करण्यासाठी, कलम ७४ ची सुधारणा करण्यात येत आहे.

(आठ) कलम ७५ च्या पोट-कलम (१२) मध्ये स्पष्टीकरण समाविष्ट करणे :-"स्वयंनिर्धारित कर" यामध्ये कलम ३७ अन्वये दाखल केलेल्या जावक पुरवठ्याच्या तपशीलाप्रमाणे प्रदेय असलेल्या, परंतु कलम ३९ अन्वये दाखल केलेल्या विवरणात समाविष्ट न केलेल्या कराचा समावेश असेल, हे स्पष्ट करण्यासाठी कलम ७५ च्या पोट-कलम (१२) मध्ये, एक स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात येत आहे.

(नऊ) कलम ८३ च्या पोट-कलम (१) सुधारणा :–तात्पुरती जप्ती ही प्रकरण बारा, प्रकरण चौदा किंवा प्रकरण पंधरा खालील कोणत्याही कार्यवाहीच्या प्रारंभापासून त्याखाली केलेल्या आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीच्या समाप्तीपर्यंतच्या संपूर्ण कालावधीसाठी वैध राहील, अशी तरतूद करता यावी म्हणून, कलम ८३ चे पोट-कलम (१) बदली दाखल करण्यात येत आहे.

(दहा) कलम १०७ च्या पोट-कलम (६) ची सुधारणा:-कलम १२९ चे पोट-कलम (३) अन्वये केलेल्या आदेशाविरूद्ध, अपीलकर्त्याद्वारे शास्तीच्या पंचवीस टक्के इतकी रक्कम प्रदान केल्याशिवाय, कोणतेही अपील दाखल करण्यात येणार नाही, अशी तरतूद करता यावी म्हणून, कलम १०७ च्या पोट-कलम (६) मध्ये, नवीन परंतुक समाविष्ट करणे हा या सुधारणेचा उद्देश आहे.

(अकरा) कलम १२९ ची सुधारणा :–मार्गस्थ वस्तू आणि वाहने अटकाव करणे, जप्त करणे आणि सोडून देणे यांच्याशी संबंधित कलमांखालील कार्यवाहींचा संबंध, वस्तू किंवा वाहन सरकारजमा करणे आणि शास्ती लादणे यांच्याशी संबंधित कलम १३० खालील कार्यवाहींपासून, संपुष्टात आणता यावा म्हणून, कलम १२९ ची सुधारणा करण्यात येत आहे.

(बारा) कलम १३० ची सुधारणा:–वस्तूं किंवा वाहने सरकारजमा करण्याशी संबंधित कलमांखालील कार्यवाहींचा संबंध, मार्गस्थ वस्तू किंवा वाहने अटकाव करणे, जप्त करणे आणि सोडून देणे यांच्याशी संबंधित कलम १२९ खालील कार्यवाहींपासून, संपुष्टात आणता यावा म्हणून, कलम १३० ची सुधारणा करण्यात येत आहे.

(तेरा) कलम १५१ बदली दाखल करणे :–अधिनियमाशी संबंधित कोणत्याही बाबीसंबंधी कोणत्याही व्यक्तीकडून माहिती मागून घेण्यासाठी आयुक्तास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास अधिकार प्रदान करता यावेत म्हणून, कलम १५१ बदली दाखल करण्यात येत आहे.

(चौदा) कलम १५२ च्या पोट-कलम (१) ची सुधारणा करणे :–संबंधित व्यक्तीला तिचे म्हणणे ऐकून घेण्याची संधी दिल्याखेरीज, कलमे १५० व १५१ अन्वये प्राप्त केलेली कोणतीही माहिती, अधिनियमान्वये कोणतीही कार्यवाही करण्याच्या प्रयोजनार्थ, वापरली जाणार नाही अशी तरतूद करता यावी यासाठी कलम १५२ च्या पोट-कलम (१) मध्ये सुधारणा करण्यात येत आहे.

(पंधरा) अनुसूची दोन ची सुधारणा करणे:–कलम ७ मध्ये केलेल्या सुधारणांच्या परिणामी दिनांक १ जुलै २०१७ पासून भूतलक्षी प्रभावाने अनुसूची दोन चा परिच्छेद ७ वगळण्यासाठी ही सुधारणा करण्याचा उद्देश आहे.

३. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,<br>
दिनांक २९ जून, २०२१.

**अजित पवार,**<br>
उप मुख्यमंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :–

**खंड १(२).** या खंडान्वये, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा आणि या अधिनियमाच्या विविध तरतुदींसाठी नेमून दिलेल्या विविध दिनांकाना भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने या अधिनियमाची उर्वरित कलमे अंमलात आणण्यासाठीचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ५.** महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ च्या कलम ४४ मध्ये सुधारणा करण्याचा हेतू असणाऱ्या, या खंडान्वये, निविष्टी सेवा वितरक, कलम ५१ व कलम ५२ अन्वये कर भरणारी व्यक्ती, नैमितिक करपात्र व्यक्ती व अनिवासी करपात्र व्यक्ती यांव्यतिरिक्त प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती ज्या वेळेत आणि ज्या नमुन्यात व ज्या रीतीने वार्षिक विवरण सादर करील त्या वेळेत आणि त्या नमुन्यात व त्या रीतीने विवरणपत्र सादर करण्यात येईल, त्यासाठी नियमांद्वारे तरतूद करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १०.** महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ च्या कलम ८३ च्या पोट-कलम (१) ची सुधारणा करण्याचा हेतू असणाऱ्या या खंडान्वये, ज्या रीतीने आयुक्ताला, करपात्र व्यक्तीच्या किंवा कलम १२२ च्या पोट-कलम (१क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या बँक खात्यासह कोणतीही मालमत्ता तात्पुत्या स्वरूपात जप्त करता येईल, त्यासाठी नियमांद्वारे तरतूद करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १२(पाच).** महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ च्या कलम १२९ च्या पोट-कलम (६) ची सुधारणा करण्याचा हेतू असणाऱ्या या खंडान्वये त्या कलमान्वये जप्त केलेली वस्तू किंवा वाहन यांची विक्री ज्या रीतीने करण्यात येईल किंवा विल्हेवाट लावण्यात येईल त्यासाठी नियमांद्वारे तरतूद करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्याचे वर नमूद केलेले प्रस्ताव हे, सामान्य स्वरूपाचे आहेत.

## वित्तीय ज्ञापन

या विधेयकात, केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ व महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यांच्या तरतुदींची एकरूपता व प्रयोज्यता कायम राखण्याच्या हेतूने, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ (२०१७ चा महा.४३) याची कलमे ७, १६,३५,४४,५०,५४,७४,७५,८३,१०७,१२९,१३०,१५१, व १५२ आणि अनुसूची दोन यांची सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे. अशा प्रकारे, राज्य विधानमंडळाचा एक अधिनियम म्हणून तो अधिनियमित केल्यावर त्यामध्ये राज्याच्या एकत्रीकृत निधीतील आवर्ती किंवा अनावर्ती खर्चाचा समावेश असेल अशी कोणतीही तरतूद, या विधेयकात नाही.

**भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ अन्वये राज्यपालांची शिफारस**

(महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, आदेशाची प्रत)

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ याच्या खंड (१) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, ते महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२१ पुरःस्थापनार्थ घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस करीत आहेत.

## सन २०२१ चे वि.स. विधेयक क्रमांक १२ - महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२१ याचे परिशिष्ट.

**(महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) अधिनियम, २०१७ यातील उतारे)**
**(सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१)**

**१.** ते **३४.** ** ** **

**३५.** (१) ते (४) ** ** ** लेखे व इतर अभिलेख.

(५) ज्या नोंदणीकृत व्यक्तीची एखाद्या वित्तीय वर्षामधील उलाढाल विहित मर्यादेपेक्षा अधिक असेल अशी प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, सनदी लेखापालाकडून किंवा परिव्यय लेखापालाकडून आपल्या लेख्यांची लेखापरीक्षा करवून घेईल आणि कलम ४४ च्या पोट-कलम (२) अन्वये लेखापरीक्षा केलेल्या वार्षिक लेख्यांची प्रत, आपसमेळ विवरणपत्र आणि यासंबंधात विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशारीतीने अशी अन्य कागदपत्रे, यांची प्रत सादर करील :

परंतु, या पोट-कलमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, ज्यांची लेखापुस्तके भारताचा नियंत्रक व महालेखापरीक्षाकडून किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये स्थानिक प्राधिकरणाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करण्यासाठी नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकाकडून लेखापरीक्षा करण्याच्या अधीन असतील, अशा केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही विभागास लागू होणार नाही.

(६) ** ** ** **

**३६.** ते **४३क.** ** ** ** **

**४४.** (१) निविष्टी सेवा वितरक, कलम ५१ किंवा कलम ५२ अन्वये कर भरणारी व्यक्ती, नैमित्तिक करपात्र व्यक्ती आणि अनिवासी करपात्र व्यक्ती, यांव्यतिरिक्त प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, प्रत्येक वित्तीय वर्षाचे वार्षिक विवरण अशा वित्तीय वर्षाच्या समाप्तीनंतरच्या ३१ डिसेंबर रोजी किंवा त्यापूर्वी, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने, इलेक्ट्रॉनिक पद्धतीने दाखल करील : वार्षिक विवरण.

परंतु, आयुक्तास, परिषदेच्या शिफारशीवरुन व कारणे लेखी नमूद करून, अधिसूचनेद्वारे, तीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नोंदणीकृत व्यक्तींच्या वर्गासाठी वार्षिक विवरण दाखल करण्याची कालमर्यादा वाढवता येईल :

परंतु आणखी असे की, केंद्रीय कर आयुक्ताने अधिसूचित केलेली कोणतीही वाढीव कालमर्यादा ही, आयुक्ताने अधिसूचित केली असल्याचे मानण्यात येईल.".

(२) कलम ३५ च्या पोट-कलम (५) अन्वये जिने आपल्या लेख्यांची लेखापरीक्षा करवून घेणे आवश्यक असेल अशी प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, वार्षिक लेख्यांची लेखापरीक्षा केलेली प्रत व लेखापरीक्षा केलेल्या वार्षिक वित्तीय विरणपत्रासह त्या वित्तीय वर्षासाठी सादर केलेल्या विवरणात घोषित केलेल्या पुरवठ्यांच्या मूल्यांचे मेळ बसविणारे पुनर्मळ विवरणपत्र आणि विहित करण्यात येतील असे इतर तपशील यांसह पोट कलम (१) खालील वार्षिक विवरण इलेक्ट्रॉनिक पद्धतीने दाखल करील.

**४५.** ते **४९ख.** ** ** ** **

**५०.** (१) या अधिनियमाच्या तरतुदीनुसार किंवा त्याखाली केलेल्या नियमांनुसार कर भरण्यास पात्र असलेली परंतु विहित कालावधीत शासनाकडे तो कर किंवा त्या कराचा कोणताही भाग भरण्यात कसूर करणारी अशी प्रत्येक व्यक्ती, ज्या कालावधीसाठी कर किंवा त्याचा कोणताही भाग भरावयाचा राहिला असेल त्या कालावधीसाठी, परिषदेच्या शिफारशीवरून शासनाकडून अधिसूचित करण्यात येईल त्याप्रमाणे अठरा टक्क्यांपेक्षा जास्त नसेल अशा दराने, स्वतःहून व्याज भरील : कराच्या विलंबित प्रदानावरील व्याज.

"परंतु, एखाद्या कर कालावधीत केलेल्या आणि कलम ३९ च्या तरतुदीनुसार नियत दिनांकानंतर सादर केलेल्या उक्त कालावधीच्या विवरणात घोषित केलेल्या पुरवठ्याच्या बाबतीत प्रदेय असलेल्या करावरील व्याज हे, असे विवरण उक्त कालावधीच्या बाबतीत, कलम ७३ किंवा कलम ७४ अन्वये कोणतीही कार्यवाही सुरू केल्यानंतर सादर केले असेल त्याखेरीज, इलेक्ट्रॉनिक रोकड खातेवहीतून जो कर भरला असेल त्या कराच्या भागावर आकारण्यात येईल.".

(२) व (३) ** ** ** **

**५१.** ते **५३क.** ** ** ** **

करा‍चा परतावा.

**५४.** (१) ते (८) ** ** ** **

(८क) जेव्हा केंद्र सरकारने राज्य कराचा परतावा संवितरित केला असेल तेव्हा अशा बाबतीत, शासन, अशा प्रकारे परतावा केलेल्या रकमेइतकी रक्कम केंद्र सरकारला हस्तांतरित करील.

(९) ते (१४) ** ** ** **

**५५.** ते **७३.** ** ** ** **

लबाडी करून किंवा हेतुपुरस्सर कोणतेही असत्य कथन करून किंवा वस्तुस्थिती दडपून त्याद्वारे न भरलेल्या किंवा कमी भरलेल्या किंवा चुकीने परतावा दिलेल्या किंवा चुकीने घेतलेल्या किंवा वापरलेल्या निविष्टी कराच्या जमा रकमेचे निश्चितीकरण.

**७४.** (१) कर चुकविण्यासाठी लबाडी करून किंवा हेतुपुरस्सर कोणतेही असत्य कथन करून किंवा वस्तुस्थिती दडपून त्याद्वारे कोणताही कर भरलेला नसेल किंवा तो कमी भरलेला असेल किंवा त्याला चुकीने परतावा दिला असेल किंवा निविष्टी कराची जमा रक्कम चुकीने घेतलेली असेल किंवा ती वापरलेली असेल असे समुचित अधिकाऱ्याच्या निदर्शनास आल्यास, तो अशा प्रकारे जिने कर भरलेला नसेल किंवा तो कमी भरलेला असेल किंवा जिला चुकीचा परतावा दिला असेल, किंवा जिने चुकीने निविष्टी कराची जमा रक्कम घेतलेली किंवा वापरलेली असेल अशा कर आकारणीयोग्य व्यक्तीवर, नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आलेली रक्कम, आणि कलम ५० अन्वये तीवर देय असलेले व्याज आणि त्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या कराच्या रकमेएवढी शास्ती का भरू नये याबाबत, कारणे दाखवा नोटीस बजावील.

(२) समुचित अधिकारी, आदेश काढण्यासाठीच्या पोट-कलम (१०) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेच्या किमान सहा महिने अगोदर पोट-कलम (१) अन्वये नोटीस काढील.

(३) पोट-कलम (१) अन्वये जेथे कोणत्याही कालावधीबद्दल नोटीस काढण्यात आली असेल त्याबाबतीतं, समुचित अधिकाऱ्यास, कर आकारणीयोग्य व्यक्तीवर, पोट-कलम (१) खालील व्याप्तीत येत असतील त्यांव्यतिरिक्त अशा इतर कालावधींच्या न भरलेल्या किंवा कमी भरलेल्या किंवा चुकीने परतावा दिलेल्या कराचा, किंवा चुकीने घेतलेल्या किंवा वापरलेल्या निविष्टी कराच्या जमा रकमेचा तपशील अंतर्भूत असलेले एक विवरणपत्र बजावता येईल.

(४) पोट-कलम (३) अन्वये विवरणपत्राच्या बजावणीस पोट-कलम (१) खालील व्याप्तीत येत असतील त्यांव्यतिरिक्त अशा कर कालावधीच्या पृष्ठ्यर्थ असलेली कारणे उक्त विवपणपत्रामध्ये नमूद केलेल्या कर चुकवण्यासाठी लबाडी करणे किंवा कोणतेही हेतुपुरस्सर असत्य कथन करणे किंवा वस्तुस्थिती दडवणे यांव्यतिरिक्त कारणांप्रमाणेच आहेत, या शर्तीच्या अधीन राहून, जणूकाही कलम ७३ च्या पोट-कलम (१) खालील ती नोटीसच बजावली आहे, असे मानण्यात येईल.

(५) कर आकारणीयोग्य व्यक्तीस, पोट-कलम (१) अन्वये नोटीस बजावण्यापूर्वी, अशा कराबाबत तिची स्वतःची खात्री करून घेऊन किंवा समुचित अधिकाऱ्याकडून खात्री करण्यात आलेल्या कराच्या आधारे, येणाऱ्या कराच्या रकमेसह तीवर कलम ५० अन्वये देय असलेले व्याज आणि अशा कराच्या रकमेच्या पंधरा टक्क्याइतकी शास्ती भरता येईल आणि असा भरणा केल्याची लेखी माहिती समुचित अधिकाऱ्याला कळविता येईल.

(६) समुचित अधिकारी अशी माहिती मिळाल्यावर, अशा भरलेल्या कराच्या किंवा या अधिनियमाच्या तरतुदींन्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये देय असलेल्या कोणत्याही शास्तीच्या रकमेच्या संबंधात पोट-कलम (१) अन्वये कोणतीही नोटीस बजावणार नाही.

(७) पोट-कलम (५) अन्वये भरलेली रक्कम, प्रत्यक्षात देय असलेल्या रकमेपेक्षा कमी भरली असल्याचे समुचित अधिकाऱ्याचे मत बनले असेल त्याबाबतीत, प्रत्यक्षात देय असलेल्या रकमेपेक्षा जेवढी रक्कम कमी भरलेली असेल तेवढ्याच रकमेच्या संबंधात पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे नोटीस काढण्याची कार्यवाही सुरू करील.

(८) पोट-कलम (१) अन्वये कर आकारणीयोग्य कोणतीही व्यक्ती, नोटीस काढल्यापासून तीस दिवसांच्या आत कलम ५० अन्वये देय असलेल्या व्याजासह उक्त कराची रक्कम आणि अशा कराच्या रकमेच्या पंचवीस टक्के इतकी शास्तीची रक्कम भरील त्याबाबतीत, उक्त नोटिशीच्या संबंधातील सर्व कार्यवाही समाप्त झाली असल्याचे मानण्यात येईल.

(९) समुचित अधिकारी, कर आकारणीयोग्य व्यक्तीकडून करण्यात आलेले अभिवेदन, कोणतेही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, अशा व्यक्तीकडून देय असलेला कर, व्याज आणि शास्तीची रक्कम निश्चित करील आणि तसा आदेश काढील.

(१०) समुचित अधिकारी, न भरलेली किंवा कमी भरलेली किंवा चुकीने घेतलेली किंवा वापरलेली निविष्टी कराची जमा रक्कम ज्या वर्षाशी संबंधित असेल त्या वर्षाचे वार्षिक विवरण दाखल करण्याच्या नियत दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीच्या आत, किंवा यथास्थिति, चुकीचा परतावा दिल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या आत पोट-कलम (९) अन्वये आदेश काढील.

(११) पोट-कलम (९) अन्वये काढलेला आदेश जिच्यावर बजावण्यात आला आहे अशी कोणतीही व्यक्ती, कलम ५० अन्वये देय असलेल्या व्याजासहीत कराची रक्कम आणि अशा कराच्या रकमेच्या पन्नास टक्के इतकी शास्ती, तो आदेश कळविण्यात आल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत भरील त्याबाबतीत, उक्त नोटिशीच्या संबंधातील सर्व कार्यवाही समाप्त झाली असल्याचे मानण्यात येईल.

**स्पष्टीकरण.—१.** कलम ७३ च्या आणि या कलमाच्या प्रयोजनासाठी,—

(एक) "उक्त नोटिशीच्या संबंधातील सर्व कार्यवाही" या शब्दप्रयोगात, कलम १३२ खालील कार्यवाहींचा समावेश असणार नाही;

(दोन) एकाच कार्यवाहीखाली कर भरण्यासाठी दायी असलेल्या मुख्य व्यक्तीला आणि काही अन्य व्यक्तींना नोटीस काढण्यात आली असेल आणि मुख्य व्यक्तीविरुद्ध अशी कार्यवाही कलम ७३ किंवा कलम ७४ अन्वये समाप्त करण्यात आली असेल तर, कलमे १२२, १२५, १२९ व १३० अन्वये शास्ती भरण्यासाठी दायी असलेल्या सर्व व्यक्तीविरुद्धची कार्यवाही समाप्त झाल्याचे मानण्यात येईल.

**स्पष्टीकरण.—२.** या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी "दडपणे" या शब्दप्रयोगाचा अर्थ, एखाद्या करपात्र व्यक्तीने, या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमान्वये सादर केलेले विवरण, विवरणपत्र, अहवाल किंवा इतर कोणतेही दस्तऐवज यांमध्ये जी तथ्ये किंवा माहिती कायदेशीररीत्या घोषित करणे आवश्यक आहे अशी तथ्ये किंवा माहिती घोषित न करणे, किंवा समुचित अधिकाऱ्याकडून लेखी स्वरूपात फर्मावण्यात आल्यावर कोणतीही माहिती सादर करण्यात कसूर करणे, असा आहे.

कर निश्चितीकरणाच्या सर्वसाधारण तरतुदी.

**७५.** (१) ते (११) ** ** ** **

(१२) कलम ७३ किंवा ७४ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ३९ अन्वये सादर केलेल्या कोणत्याही विवरणानुसार स्वयंनिर्धारित केलेली कराची कोणतीही रक्कम एकतर पूर्णतः किंवा अंशतः भरलेली नसेल किंवा अशा कराच्या रकमेवर देय असलेली व्याजाची कोणतीही रक्कम भरलेली नसेल त्याबाबतीत, ती रक्कम कलम ७९ मधील तरतुदींअन्वये वसूल करण्यात येईल.

(१३) ** ** ** **

**७६. ते ८२.** ** ** ** **

विवक्षित प्रकरणी महसुलाचे रक्षण करण्यासाठी तात्पुरती जप्ती आणणे.

**८३.** (१) कलम ६२, किंवा कलम ६३ किंवा कलम ६४ किंवा कलम ६७ किंवा कलम ७३ किंवा कलम ७४ यांखालील कोणतीही कार्यवाही प्रलंबित असताना, शासनाच्या महसुलाच्या हिताचे रक्षण करण्याच्या प्रयोजनासाठी, प्रयोजनासाठी, तसे करणे आवश्यक असल्याबाबत आयुक्ताचे मत झाले असेल त्या बाबतीत, त्यास लेखी आदेशाद्वारे, विहित करण्यात येईल अशा रीतीने करपात्र व्यक्तीच्या बँक खात्यासह तिच्या मालकीच्या कोणत्याही मालमत्तेवर, तात्पुरती जप्ती आणता येईल.

(२) ** ** ** **

**८४.** ते **१०६.** ** ** ** **

अपील प्राधिकाऱ्याकडे अपिले करणे.

**१०७.** (१) ते (५) ** ** ** **

(६) जर अपीलकर्त्याने,—

(क) त्याने कबूल केल्याप्रमाणे आक्षेपित आदेशानुसार उद्‌भवलेल्या कराच्या रकमेचा असा भाग, व्याज, दंड, शास्ती, फी यांचा पूर्णतः भरणा केला नसेल ; आणि

(ख) ज्याच्यासंबंधात अपील दाखल करण्यात आले असेल त्या उक्त आदेशातून उद्‌भवलेल्या उर्वरित विवादग्रस्त कराच्या, पंचवीस कोटी रुपये या कमाल रकमेस अधीन राहून, रकमेच्या दहा टक्के इतक्या रकमेचा भरणा केला नसेल तर, पोट-कलम (१) अन्वये कोणतेही अपील दाखल करण्यात येणार नाही.

(७) ते (१६) ** ** ** **

**१०८.** ते **१२८.** ** ** ** **

मार्गस्थ वस्तू व वाहने अटकाव करणे, ती जप्त करणे व सोडून देणे.

**१२९.** (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही व्यक्तीने, या अधिनियमाच्या तरतुदीचे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे उल्लंघन करून कोणत्याही वस्तूंची वाहतूक केल्यास किंवा मार्गस्थ असताना कोणत्याही वस्तूंची साठवणूक केल्यास अशा सर्व वस्तू आणि उक्त वस्तूंची वाहतूक करण्याचे साधन म्हणून वापरण्यात आलेले वाहन आणि अशा वस्तूशी आणि वाहनाशी संबंधित दस्तऐवज या अटकाव किंवा जप्त करण्यास पात्र असतील आणि अटकाव किंवा जप्त केल्यानंतर,—

(क) असा कर व शास्ती भरण्यासाठी पुढे येणाऱ्या वस्तूच्या मालकाने, लागू असलेल्या कराचा आणि देय असलेल्या कराच्या शंभर टक्के इतक्या समतूल्य शास्तीचा भरणा केल्यावर आणि करमाफ वस्तूंच्या प्रकरणी अशा वस्तूंच्या मूल्याचा दोन टक्के इतक्या समतूल्य रकमेचा किंवा रुपये पंचवीस हजार, यापैकी जी कमी असेल त्या रकमेचा भरणा केल्यावर ;

(ख) असा कर किंवा शास्ती भरण्यास पुढे न येणाऱ्या मालकाने, वस्तूच्या असलेल्या कराचा आणि भरणा केलेल्या कराची रक्कम वजा करून मूल्याच्या पन्नास टक्के इतक्या समतूल्य रकमेचा भरणा केल्यावर आणि करमाफ वस्तूच्या प्रकरणी अशा वस्तूंच्या मूल्याच्या पाच टक्के किंवा रुपये पंचवीस हजार यांपैकी जी कमी असेल त्या रकमेचा भरणा केल्यावर ;

(ग) खंड (क) किंवा खंड (ख) अन्वये, विहित करण्यात येईल अशा स्वरूपात किंवा अशा रीतीने, देय रकमेच्या समतूल्य प्रतिभूती सादर केल्यावर ; सोडून देण्यात येतील :

परंतु, वस्तूंची वाहतूक करणाऱ्या व्यक्तीवर अटकाव केल्याचा किंवा जप्त केल्याचा आदेश बजावल्याखेरीज, अशा वस्तू किंवा वाहन यांस अटकाव करता येणार नाही किंवा त्या जप्त करता येणार नाहीत.

(२) कलम ६७ च्या पोट-कलम (६) च्या तरतुदी, जप्त वस्तू व वाहने यांस अटकाव आणि जप्त करण्यासाठी योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

(३) वस्तू व वाहने यांस अटकाव करणारा किंवा ते जप्त करणारा समुचित प्राधिकारी देय असणारा कर व शास्ती विनिर्दिष्ट करणारी नोटीस देईल आणि त्यानंतर, खंड (क) किंवा खंड (ख) किंवा खंड (ग) अन्वये कर व शास्तीचा भरणा करण्याचा आदेश देईल.

(४) संबंधित व्यक्तीला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्याखेरीज पोट-कलम (३) अन्वये कोणताही कर, त्यावरील व्याज किंवा शास्ती याची रक्कम निश्चित करण्यात येणार नाही.

(५) ** ** ** **

(६) कोणत्याही वस्तूची वाहतूक करणाऱ्या व्यक्तीने किंवा वस्तूच्या मालकाने, अशा वस्तू किंवा वाहन यांस अटकाव किंवा त्या जप्त केल्याच्या चौदा दिवसांच्या आत पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे कराच्या व शास्तीच्या रकमेचा भरणा करण्यात कसूर केल्यास, कलम १३० नुसार पुढील कार्यवाही सुरू करण्यात येईल :

परंतु, जेव्हा अटकाव केलेल्या किंवा जप्त केलेल्या वस्तू या नाशवंत किंवा धोकादायक स्वरूपाच्या असतील किंवा वेळ गेल्यामुळे त्यांची किंमत कमी होण्याची शक्यता असेल तर, उक्त चौदा दिवसांचा कालावधी समुचित अधिकाऱ्यामार्फत कमी करण्यात येईल.

वस्तू किंवा वाहन सरकारजमा करणे आणि शास्ती लादणे.

**१३०.** (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी जर एखादी व्यक्ती,—

(एक) कराचे प्रदान चुकविण्याच्या हेतूने या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लघंन करून, कोणत्याही वस्तूंचा पुरवठा करीत असेल किंवा प्राप्त करीत असेल ; किंवा

(दोन) या अधिनियमान्वये ज्या कोणत्याही वस्तूंवर कर देण्यास तो दायी असेल त्या कोणत्याही वस्तूंचा हिशेब ठेवत नसेल ; किंवा

(तीन) नोंदणीसाठी अर्ज न करता, या अधिनियमान्वये करपात्र असलेल्या कोणताही वस्तूंचा पुरवठा करीत असेल ; किंवा

(चार) कराचे प्रदान चुकविण्याच्या हेतूने या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करीत असेल ; किंवा

(पाच) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन करून, करपात्र वस्तू वाहून नेण्यासाठी वाहतुकीचे साधन म्हणून कोणत्याही वाहनाचा वापर करण्यात आला असेल आणि, अशा प्रकारे केलेला वाहनाचा वापर हा स्वतः वाहनाच्या मालकाला, त्याच्या एजन्टला, कोणताही असल्यास, आणि वाहनाचा ताबा ज्या व्यक्तीकडे असेल त्या व्यक्तीला ज्ञात नसताना किंवा त्याकडे काना डोळा न करता करण्यात आला होता, असे वाहन मालकाने सिद्ध केले नसेल तर, अशा सर्व वस्तू किंवा वाहने सरकारजमा करण्यास पात्र असतील आणि ती व्यक्ती, कलम १२२ अन्वये शास्तीस दायी असेल.

(२) कोणतीही वस्तू अथवा वाहन सरकारजमा करण्याचा जेव्हा जेव्हा या अधिनियमान्वये प्राधिकार देण्यात येईल तेव्हा त्याबाबत वाहन मालकास किंवा वाहनाचा ताबा ज्या व्यक्तीकडे असेल त्या व्यक्तीस अशा वस्तू सरकारजमा करण्याऐवजी उक्त न्यायनिर्णय अधिकारी, त्यास योग्य वाटेल असा दंड भरण्याबाबत विकल्प देईल :

परंतु, असा दंड हा, सरकारजमा केलेल्या वस्तूच्या, त्यावर आकराणी योग्य असलेला कर कमी करून आलेल्या बाजार मूल्याहन अधिक असणार नाही :

परंतु आणखी असे की, असा दंड व लादण्यायोग्य शास्ती यांची एकूण रक्कम कलम १२९ च्या पोट-कलम (१) अन्वये लादण्या योग्य असलेल्या शास्तीच्या रकमेपेक्षा कमी असणार नाही :

परंतु तसेच, जेथे वस्तू वाहून नेण्यासाठी किंवा प्रवासी भाड्यासाठी कोणतेही असे वाहन वापरण्यात आले असेल तर, वाहन मालकाला, वाहन सरकारजमा करण्याऐवजी त्यातून वाहून नेण्यात येत असलेल्या वस्तूवर देय असलेल्या कराच्या रकमेइतका दंड भरण्याचा विकल्प देण्यात येईल.

(३) जेथे पोट-कलम (२) अन्वये वस्तू सरकारजमा करण्याऐवजी कोणताही दंड लादण्यात आला असेल तेथे, अशा वस्तूचा किंवा वाहनाचा मालक किंवा पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली व्यक्ती, अशा वस्तूंच्या किंवा वाहनाच्या बाबतीत, उक्त दंडाव्यतिरिक्त देय असलेला कोणताही कर, शास्ती व आकार भरण्यास दायी असेल.

(४) ते (७) ** ** ** **

**१३१.** ते **१५०.** ** ** ** **

आकडेवारी गोळा करण्याचा अधिकार.

**१५१.** (१) आयुक्ताला तसे करणे आवश्यक आहे असे वाटले तर, त्याला अधिसूचना काढून या अधिनियमाद्वारे किंवा त्या संबंधात हाताळण्यात येईल अशा कोणत्याही बाबीसंबंधी आकडेवारी गोळा करण्यात यावी, असा निदेश देता येईल.

(२) अशी अधिसूचना काढण्यात आल्यावर, आयुक्ताला, किंवा याबाबत आयुक्ताने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीला, ज्या संबंधी आकडेवारी गोळा करावयाची असेल अशा कोणत्याही बाबीसंबंधी, त्यात विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने अशी माहिती किंवा विवरण सादर करण्यास संबंधित व्यक्तींना फर्माविता येईल.

माहिती उघड करण्यास रोध.

**१५२.** (१) कलम १५० किंवा कलम १५१ च्या प्रयोजनासाठी, देण्यात आलेल्या कोणत्याही बाबीच्या संबंधातील कोणत्याही व्यक्तिगत विवरणात किंवा त्याच्या भागात दिलेली कोणतीही माहिती, संबंधित व्यक्तीच्या किंवा त्याच्या प्राधिकृत प्रतिनिधींच्या लेखी पूर्वसंमतीशिवाय, त्यातील कोणताही तपशील एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या संदर्भातील आहे, असे ओळखणे शक्य होईल अशा रीतीने प्रसिद्ध करण्यात येणार नाही आणि अशी कोणतीही माहिती या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या प्रयोजनासाठी वापरता येणार नाही.

(२) या अधिनियमाखालील किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही अधिनियमाखालील खटल्याच्या प्रयोजनांसाठी असेल त्याव्यतिरिक्त, या अधिनियमान्वये आकडेवारी गोळा करण्याचे किंवा या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी तिचे संकलन किंवा संगणकीकरण करण्याचे काम जी व्यक्ती करीत नसेल, अशा कोणत्याही व्यक्तीस, कलम १५१ मध्ये निर्दिष्ट केलेली कोणतीही माहिती किंवा कोणतेही वैयक्तिक विवरण पाहण्याची किंवा उपलब्धतेची परवानगी असणार नाही.

(३) ** ** ** **

**१५३.** ते **१७४.** ** ** ** **

**अनुसूची एक.** ** ** ** **

## अनुसूची दोन

[ कलम ७ पहा ]

वस्तूंचा पुरवठा किंवा सेवांचा पुरवठा समजावयाचे कार्य किंवा व्यवहार

(१) व (६) ** ** ** **

(७) वस्तूंचा पुरवठा.—पुढील बाबी वस्तूंचा पुरवठा असल्याचे मानण्यात येईल, त्या बाबी अशा :—

कोणत्याही अविधिसंस्थापित संघाने किंवा व्यक्तींच्या मंडळाने त्याच्या सदस्यांना रोख रक्कम विलंबित प्रदान किंवा अन्य मौल्यवान मोबदला यासाठी केलेला वस्तूंचा पुरवठा.

**अनुसूची तीन.** ** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२.]**

**[महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

**[श्री. अजित पवार,**
उप मुख्यमंत्री.**]**

**राजेन्द्र भागवत,**
सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.